● गुरुवार, दि १९ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ५८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनस्नेहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282





## बाप्पांना निरोप... दुसऱ्या दिवशी अडीच वाजेपर्यंत श्री गणेश मुर्ती विसर्जन...

**गणेशोत्सवात दहाव्या दिवशी बाप्पांना जल्लोषात निरोप देण्यात आला. डिजेचा दणदणाट, ढोल-ताशांचा आवाज, पारंपारिक वाद्य, वेषभुषा, विविध देखाव्यात जालना शहरातून बाप्पांना निरोपासाठी मिरवणुक काढण्यात आली. प्रसंगी पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त ठेवला होता. जालना शहर महानगरपालिके विसर्जनाची संपुर्ण तयारी करण्यात आली होती. महानगर पालिकेच्या वतीने ४१३ श्री गणेश मंडळांच्या तर जवळपास २४ हजार घरगुती श्री गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यात आले. विसर्जन सोहळा दुसऱ्या दिवशी म्हणजे बुधवार (दि १८) रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत सुरु होता. श्री गणेश मुर्ती विसर्जन सोहळा व्यवस्थित पार पडला. यासाठी जालना पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन, आरोग्य सेवा, पत्रकार, स्वयंसेवी संस्था, सेवाभावी संस्था, श्री गणेश मंडळ आणि शहरातील नागरिकांनी महानगरपालिकेला सहकार्य केले. (छाया - किरण खानापुरे )**

## आ. संजय गायकवाड यांच्या वक्तव्याचा परतूर काँग्रेसच्यावतीने निषेध

**परतूर । प्रतिनिधी -** मुख्यमंत्र्यांची लाडकी पिलावळ सातत्याने वाचाळवीरा सारखे चिथावणी खोर वक्तव्य करत आहेत. कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्याचं ज्यांच काम आहे तेच सातत्याने कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचे काम करत आहेत.

काँग्रेस पक्षाचे नेते, लोकसभा विरोधी पक्षनेते खा.राहुलजी गांधी यांच्या विरोधात मुख्यमंत्र्यांचे लाडके आमदार संजय गायकवाड यांनी चिथावणीखोर वक्तव्य केले आहे.

आमदार संजय गायकवाड यांच्या वक्तव्याचा काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करत आमदार संजय गायकवाड यांच्यावर कार्यवाही करून गुन्हा दाखल करण्याच्या मागणीचे निवेदन परतुर पोलीस स्टेशनला दिले.

यावेळी काँग्रेस पक्षाचे अनुसूचित जाती जमाती जिल्हाध्यक्ष बालासाहेब अंबिरे, तालुकाध्यक्ष बाबाजी गाडगे, इंद्रजित घनवट, आशिष जेथलिया, सुरेश सवणे, बाबुराव हिवाळे, रेहमुशेठ कुरेशी, लक्ष्मण शिंदे, दत्तराव अंभुरे, **पान २ वर**



## बांधकाम कामगार कार्यालयात अनागोंदी कारभार

### चौकशी करुन कारवाई करा

**जालना । प्रतिनिधी -** येथील बांधकाम कामगार कार्यालयात अनागोंदी कारभार सुरु असून गोर गरीब कामगारांना सोई सुविधेपासून वंचित ठेवल्या जात असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन कणसे यांनी केला आहे. कार्यालयात दलालांचा वावर वाढला असून अधिकारी हितसंबंध जपून कामगारांसाठी कॅम्प दलालांना देत आहेत. या सर्व प्रकाराची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अन्यथा येत्या २३ सप्टेंबर पासून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा ईशाराही श्री कणसे यांनी दिला आहे.

### मनकासेचे अर्जुन कणसे यांचा उपोषणाचा ईशारा

यासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, बांधकाम कामगार कार्यालयात गोंधळ सुरु आहे. शासनाकडुन गोर गरीबांना सुविधा दिल्या जतो. परंतु बांधकाम कार्यालय गोर गरीबांपर्यंत या योजनेचा फायदा पोहचू देत नाही. दलालांमार्फत या कार्यालयाचे काम काज सुरु आहे. गोर-गरीब कामगारांना सुरक्षा किट, संसार किट देण्यासाठी मी प्रयत्न केला. येथील अधिकाऱ्यांना वारवर भेटलो. कॅम्पची मागणी केली. मात्र, या अधिकाऱ्यांना याकडे लक्ष दिले नाही. केवळ दलालांना कॅम्प देण्यात आले असल्याचा आरोपही निवेदनातून करण्यात आला आहे. परिणामी गोर गरीब जनतेची फसवणूक होत आहे. या सर्व अनागोंदी कारभाराला त्वरीत थांबविण्यात यावे. अधिकारी आणि दलालांचे होत असलेले मोबाईल वरील संभाषणाची चौकशी करण्यात यावी. अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यात यावी. तसेच या कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या तात्काळ बदल्या करण्यात याव्यात व गोर- गरीबांना न्याय देण्यात यावा. कामगारांचे अर्ज अपडेट तसेच रिनीवल साठी सहा-सात महिने उलटल्यानंतरही काम होत नाही. कार्यालयाच्या चकरा या कामगारांना माराव्या लागत आहेत. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करुन अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी अन्यथा येत्या २३ सप्टेंबर २०२४ पासून आमरण उपोषणास बसणार असल्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे.

निवेदनावर महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन कणसे यांची स्वाक्षरी आहे.

## मुक्तीसंग्रामाच्या भित्तिचित्राचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी महत्वपूर्ण योगदान दिले या सर्व थोर स्वातंत्र्य सैनिकांच्या महान कार्याची आठवण व त्यांना श्रध्दांजली देण्याकरीता जालना येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नूतन जिल्हा नियोजन समितीच्या इमारतीमधील पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या कार्यालया समोरील दर्शनिय भागात मुक्तीसंग्रामाचा इतिहास व वारसा सांगणारे भित्तिचित्राचे लोकार्पण पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

यावेळी माजी मंत्री अर्जून खोतकर, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व महान हुतात्मे आणि स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेल्या लढ्याचे मोल फार मोठे आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामात निजामाच्या जूलमी **पान २ वर**



युवा आदर्श

**धन्यवाद ...**

**जन सागर लोटला**
**गर्दी सणांची अलोट**
**जेत्यांच्या स्वागतास**
**जय घोष एळकोट**
**धन्यवाद पोलीसांनो**
**बंदोबस्त कडेकोट**
**नियंत्रण सुटे जरासे**
**भिती करे कडेलोट**
**सरकारी यंत्रणेलाही**
**नेहमी दाखवतो बोट**
**सांघिक प्रयास काम**
**लागले ना गाल बोट**
**वरून आले आदेश**
**बांधलेली छान मोट**
**हाथरस ताजी घटना**
**होतो असा विस्कोट**
**गणित जरासे चुकता**
**होऊ शकतो विस्पोट**
**ज्ञात अज्ञात कार्यकर्ते**
**सेवाव्रताचे बांधे गोठ**
**अविरत राहे कार्यरत**
**पाणी ना ते एक घोट**
**अभिनंदन करु त्यांचे**
**बंदिस्त नको बा ओठ**
**माणूसहो संवेदनशील**
**मनेका संकुचित थोट**
**दोषा रोप करायलांच**
**का सळसळ करे बोट**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## जालना जनसेवा ग्रुपचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे - घनश्याम गोयल

### श्री गणेश भक्तांना जिलेबी आणि कचोरीचे वाटप

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि धार्मिक क्षेत्रातील जालना जनसेवा ग्रुपचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे आणि तेवढेच प्रेरणादायी आहे. या ग्रुपचे कार्य यापुढेही अखंडितपणे असेच सुरू राहो, अशा सदिच्छा कालिका स्टील इंडस्ट्रीजचे चेअरमन घनश्याम गोयल यांनी दिल्या. या ग्रुपच्या प्रत्येक उपक्रमाला आपले सदैव सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

येथील जालना जनसेवा ग्रुपच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शहरातील राजेंद्र प्रसाद रोडवरील रोहीत इलेक्ट्रॉनिकसमोर १५ सप्टेंबर रोजी गणेश भक्तांना प्रसाद स्वरूपात शुद्ध तुपातील ४ क्विंटल केसर जिलेबी वाटपाचा शुभारंभ घनश्याम गोयल यांच्याहस्ते व माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, मनोज महाराज गौड, किशोर तिवारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. १६ ऑक्टोबर रोजी याच ठिकाणी सायंकाळी ७ ते १० या वेळेत सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे आयोजित आयएसओ प्रमाणित, स्वादिष्ट व पौष्टिक १५ हजार शेगाव कचोरी वाटपाचा शुभारंभ जालना जनसेवा ग्रुपचे सदस्य पन्नालाल बगडिया यांच्या हस्ते व माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, काँग्रेसचे युवा नेते अक्षय गोरंट्याल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी जालना जनसेवा ग्रुपचे अध्यक्ष पुरुषोत्तम मोतीवाला, सचिव डॉ. रामनारायण जैस्वाल, उपाध्यक्ष सुनील लाहोटी, कोषाध्यक्ष गोवर्धन अग्रवाल आदींची उपस्थिती होती.

यावेळी माजी मंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, जालना जनसेवा ग्रुपच्या प्रत्येक क्षेत्रातील कार्याचे आपण साक्षीदार आहोत. ग्रुपच्या नावातच जनसेवा असून, ग्रुपमधील प्रत्येक सदस्याला समाजसेवेने झपाटलेले असून, विद्यार्थ्यात स्किल डेव्हलपमेंट व्हावी, यासाठी दिले जात असलेले आर्थिक योगदान आणि मदतीचा हात त्यांचे आयुष्य बदलणारा आहे. जनसेवाच्या या कार्याला **पान २ वर**



# संपादकीय

## क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करा!

आजपासून म्हणजे १९ सप्टेंबर पासून भारतीय क्रिकेटचा नवा हंगाम सुरू होत आहे. या हंगामाची सुरुवात बांगलादेश सोबत आजपासून सुरू होणाऱ्या कसोटीपासून होत आहे. आजपासून चेन्नई येथील चेपॉक मैदानावर भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिली कसोटी लढत रंगणार आहे. बांगलादेशचा संघ भारतात दोन कसोटी आणि तीन टी २० सामने खेळणार आहे. या मालिकेकडे केवळ भारताचेच नाही तर क्रिकेट विश्वाचे लक्ष लागले आहे. वास्तविक बांगलादेश याआधी ज्या ज्या वेळी भारत दौऱ्यावर आला त्या त्या वेळी प्रसार माध्यमांनी आणि जागतिक क्रिकेटने त्याची म्हणावी दखल घेतली नाही त्याला कारणही तसेच होते कारण भारत आणि बांगलादेश या दोन्ही देशात भारतच नेहमी वरचढ राहिला आहे. बांगलादेशने भारता विरुद्ध आजवर एकही कसोटी जिंकली नाही त्यामुळे बांगलादेश संघाला ना भारतीय प्रेक्षक जमेस धरत होते ना प्रसार माध्यमे मग यावेळेसच प्रसार माध्यमांचे आणि क्रिकेटप्रेमिंचे या दौऱ्याकडे लक्ष का ? तर त्याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला काही दिवस मागे जावे लागेल. काही दिवसांपूर्वी बांगलादेशचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर गेला होता. या दौऱ्याकडे देखील प्रसार माध्यमांनी दुर्लक्षच केले होते कारण सर्वांना वाटले होते की पाकिस्तान बांगलादेशला सहज नमवेल कारण पाकिस्तान संघ हा बांगलादेश पेक्षा बलवान संघ होता मात्र प्रत्यक्ष घडले उलटेच. पाकिस्तानने बांगलादेशची शिकार करण्याऐवजी बांगलादेशनेच पाकिस्तानची शिकार केली. बांगलादेशने पाकिस्तानला सलग दोन कसोटीत नमवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला. बांगलादेश अशी ऐतिहासिक कामगिरी करेल अशी अपेक्षा कोणालाच नव्हती मात्र त्यांनी ती कामगिरी केली. पाकिस्तानला नमवणाऱ्या बांगलादेश संघात जे खेळाडू होते तेच खेळाडू भारत दौऱ्यावर आले आहेत म्हणूनच या संघाने पाकिस्तानात जी कामगिरी केली त्याची पुनरावृत्ती ते भारतात करतील का ? हे पाहण्यासाठी संपूर्ण क्रिकेट विश्वाचे लक्ष या मालिकेकडे लागले आहे. पाकिस्तानला पाकिस्तानात जाऊन पाणी पाजल्यावर बांगलादेश संघाचे मनोबल ही खूप वाढले आहे. बांगलादेशच्या कर्णधाराने थेट भारताला पराभूत करण्याची भाषा केली आहे अर्थात बांगलादेशने कितीही फुशारक्या मारल्या तरी बांगलादेश भारताला पराभूत करू शकत नाही कारण भारत म्हणजे पाकिस्तान नाही. भारताचा संघ हा क्रिकेट विश्वातील सर्वात बलवान संघ आहे. भारताची फलंदाजी जगातील सर्वात बलवान फलंदाजी आहे तर गोलंदाजी जगातील सर्वात घातक गोलंदाजी आहे. रोहित शर्मा, यशस्वी जयस्वाल, शुभमन गील, विराट कोहली, के एल राहुल, ऋषभ पंत ही फलंदाजांची लाईन अप पाहिली तरी धडकी भरते. जगातील सध्याचा सर्वात घातक वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा आणि मोहंमद सिराज ही वेगवान जोडगोळी भारताला सुरुवातीलाच बळी मिळवून देतात तर आश्विन, जडेजा आणि अक्षर पटेल ही फिरकी तिकडी प्रतिस्पर्धी संघाला लोटांगण घालायला लावण्यास पुरेशी आहे शिवाय कुलदीप यादव हा देखील आपल्याकडे आहे त्यामुळे भारत ही मालिका २ - ० ने सहज जिंकेल आणि ती तशी जिंकायलाही हवी कारण ही मालिका भारताला विश्व टेस्ट चॅम्पियनशिपच्या ( थढउ ) फायनल मध्ये पोहचवण्यासाठी खूप महत्वाची आहे. भारताने जर बांगलादेशला क्लीन स्वीप दिला तर भारताचे पॉइंट वाढतील त्याचा भारताला मोठा फायदा होईल. शिवाय भारताला विजयाची लय सापडेल कारण या मालिके नंतर भारताला इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यासारख्या तगड्या संघाविरुद्ध खेळायचे आहे. जर भारताला विजयी लय सापडली तर त्याचा फायदा इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध होऊ शकतो. म्हणूनच भारतासाठी ही महत्वाची मालिका आहे. भारतीय खेळाडूंना देखील हे चांगले माहीत आहे म्हणूनच भारतीय संघातील खेळाडू ही मालिका २ - ० ने जिंकण्यासाठी जीवाचे रान करतील यात शंका नाही. क्रिकेटच्या नव्या हंगामाची सुरुवात विजयाने करण्यासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्रासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रयत्नांची जागतिक पातळीवर दखल

## वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमच्या २० देशातील प्रतिनिधींच्या उपस्थितीत होणार सन्मान सोहळा

**मुंबई । प्रतिनिधी -** पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्र यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केलेल्या कार्यासाठी वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमच्या वतीने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचा सन्मान करण्यात येणार आहे. एनसीपीए येथे २० देशातील प्रतिनिधींच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय बांबू दिवसाचे औचित्य साधत उद्या १८ सप्टेंबर रोजी हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

**पर्यावरण व शाश्वत विकासासाठी महाराष्ट्र देशात प्रथम**

आता तापमान वाढीचे युग संपून होरपळीचे युग सुरू झाल्याने त्वरित कृतीची गरज संयुक्त राष्ट्र संघटनेने व्यक्त केली आहे. त्यास प्रतिसाद देणारा भारत हा पहिला देश ठरला आहे तर महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. यासाठी राज्यात मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास कृती समितीची स्थापना केली असून त्याचे अध्यक्ष मुख्यमंत्री श्री. शिंदे आहेत. अंमलबजावणीसाठी कार्यकारी अध्यक्षपदी पाशा पटेल यांना नेमून संबंधित सचिव यांचे कार्यकारी मंडळ देखील तयार करण्यात आले आहे. तसेच मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी त्यासाठी पहिले पाऊल टाकले. तापमान वाढ कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी हरित महाराष्ट्राची संकल्पना त्यांनी मांडली. त्याशिवाय औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये ५ टक्के बायोमास वापरायचे देखील निर्देश संबंधित विभागांना दिले आहेत. त्यासाठी ११ लाख हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवडीचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर अर्थसंकल्पामध्ये उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी १ लाख २० हजार एकर क्षेत्रामध्ये बांबू लागवडीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या प्रयत्नांमुळे ग्रीकल्चर टुडे या संस्थेने मुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा दिल्लीमध्ये नुकताच सन्मान केला. त्याची दखल आता थेट जागतिक पातळीवर घेण्यात आली व वर्ल्ड ग्रीकल्चर फोरमने पुढाकार घेऊन जागतिक स्तरावर मुख्यमंत्र्यांच्या कामाची दखल घेतली आहे.

**'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम' अन्नसुरक्षा विषयी जागतिक व्यासपीठ**

'वर्ल्ड एग्रीकल्चर फोरम' हे अन्नसुरक्षा विषयी जागतिक नेत्यांना चर्चा करण्यासाठीचे व्यासपीठ आहे. जागतिक कृषी मंचचे अध्यक्ष डॉ. रुडी रॅबिंज हे आहेत. कृषी क्षेत्रातील प्रगतीच्या अनुषंगाने भविष्यातील धोरण आणि जागतिक स्तरांवर होत असलेल्या कामांची दखल घेऊन जागतिक पुरस्कारासाठी जगातील विविध देशातून नामांकन विचारात घेण्यात येतात. जागतिक परिणामकारक वनस्पती विज्ञान, कृषी विषयक विविध पैलूंबद्दल माहिती घेताना उत्पादन, व्यापार, तंत्रज्ञान, व्यवसाय, धोरण आणि आर्थिक परिस्थिती, पोषण, अन्न प्रक्रिया, पाणी आणि पर्यावरण या व्यापक बाबींचा समावेश करते. यासाठी निवड योग्यता आणि पूर्णतेसाठी नामांकनांचे पुनर्विलोकन करून, ते निवडीसाठी पाठवले जातात. निवड समिती नंतर नामांकनांचे पुनर्विलोकन करते आणि प्राप्तकर्त्यांची शिफारस करते. बुधवारी १८ सप्टेंबर रोजी होणाऱ्या मुंबईतील या कार्यक्रमाचे आयोजन फिनिक्स फाउंडेशन (लोदगा, जिल्हा लातूर) यांनी केले असून १८ सप्टेंबर या आंतरराष्ट्रीय बांबू दिवसाचे औचित्य साधून हा कार्यक्रम एनसीपीए सभागृहात सकाळी ११ वाजेपासून तर रात्री नऊ वाजेपर्यंत विविध चर्चासत्रांमध्ये पार पडणार आहे. यामध्ये जगभरातील या विषयातले तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. त्याच दिवशी संध्याकाळी सहा ते नऊ या वेळेत मुख्य सत्काराचा कार्यक्रम होईल.

# संजीवनी प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल टेंभूर्णी येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिवस उत्साहात

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** येथील संजीवनी प्री प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा डोमाळे मॅडम होत्या तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन उपमुख्याध्यापीका सौ भाग्यश्री जाधव मॅडम होत्या. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन श्री सांडू महाराज उखर्डे, श्री महादू भाऊ धारे, सौ पुजा जाधव सौ प्रतिक्षा उखर्डे, सौ अश्विनी उखर्डे, सौ ललिता बाई उखर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती सर्वप्रथम प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ध्वज पुजन सौ पुजा जाधव यांनी केले तर ध्वजारोहण श्री सांडू महाराज उखर्डे यांनी केले. मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक क्रांतिकारकाणी आपल्या प्राणाचे बलिदान दिले असे मत प्रमुख मार्गदर्शिका सौ भाग्यशी जाधव यांनी मांडले तर अध्यक्षीय समारोप करताना विध्यार्थ्यांनी महान क्रांतिकरनाचे विचार आत्मसाद करावे असे प्रतिपादन वर्षा डोमाळे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा सतिश जाधव सर यांनी केले तर आभार प्रदर्शन शिला जाधव मॅडम यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वैशाली पंडित मॅडम,दिक्षा चंदनशिवे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्वात शेवटी खाऊ ( चॉकलेट ) वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली



# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी जालना येथे २५ कोटीचे रेशीम पार्क व प्रशिक्षण केंद्र होणार असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात देवमुर्ती येथे दिशा सिल्क इंडस्ट्रीजकडून राज्यातील पहिले टोमॅटीक रिलींग केंद्र सुरू करण्यात आले. तसेच या ठिकाणी पुढील प्रक्रियेतील रेशीम धाग्यास पीळ देण्याचे युनिट ही लवकरच सुरू होणार आहे. जिल्ह्यात रेशीम पार्क व प्रशिक्षण केंद्राच्या उभारणीच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या घोषणेने जिल्ह्यातील रेशीम वरील प्रक्रियामुळे रोजगार निर्मितीत वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पादन वाढण्यास मदत होईल, असे मत राज्याचे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केले आहे.

जिल्ह्यात रेशीम उद्योगाकरीता आवश्यक वातावरण, अंडीपुंज निर्मिती केंद्र, कोष बाजारपेठ, उत्कृष्ट चॉकी केंद्र, रेशीम धागा करणारे युनिट अशा सर्व सुविधा उपलब्ध आहेत. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २५ कोटी रुपयांचे रेशीम पार्क व प्रशिक्षण केंद्र उभारणी करण्याची घोषणा केली आहे. या रेशीम पार्क व प्रशिक्षण केंद्रामुळे जालना जिल्ह्यातील रेशीम शेतीला गती मिळेल, असे मत जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी व्यक्त केले आहे.

जिल्ह्यात हमखास बाजारपेठ उपलब्ध असणारा व शेतकऱ्यांना शाश्वत उत्पादन देणारा रेशीम उद्योग शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे. राज्यातील एकुण तुती लागवडीपैकी जवळपास ६० टक्के क्षेत्र हे मराठवाडा विभागात आहे. पूर्वी रेशीम कोष विक्रीसाठी परराज्यात जावे लागत होते. परंतु वर्ष २०१८ मध्ये जालना कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पुढाकाराने राज्यातील पहिली रेशीम कोष बाजारपेठ सुरू करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना जवळच कोष विक्रीची सुविधा निर्माण झाल्याने रेशीम शेतीला चालना मिळाली.

रेशीम पार्क व प्रशिक्षण केंद्राची मुळ संकल्पना जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या कल्पकतेमधुन तयार झालेली आहे. तसेच त्यांनी वेळोवेळी रेशीम शेतकरी मेळाव्यास व नोंदणी कार्यक्रमात आवर्जून हजेरी लावत शेतकऱ्यांना तुती लागवडीबाबत प्रवृत्त करुन रेशीम शेती विषयक वेळोवेळी मार्गदर्शनही केले आहे. या प्रकल्पाचा प्रारुप आराखडा जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांनी तयार केला.

कोणत्याही व्यक्तीने या केंद्रास भेट दिल्यावर त्यांना रेशीम उद्योगातील सर्व प्रक्रिया पाहण्यास व अनुभवण्यास मिळणार आहेत. करमणुक, मनोरंजनाव्दारे रेशीम उद्योगाचा प्रचार व प्रसिध्दी ही मुळ संकल्पना यामध्ये असणार आहे. रेशीम पार्कमध्ये सर्व प्रकारच्या रेशीमचे मातृवृक्ष लागवड, प्रशिक्षण केंद्र, प्रशिक्षण सभागृह, निवास व्यवस्था असेल. मॉडेल चॉकी किटक संगोपन गृह, मॉडेल किटक संगोपन गृह,रंगकाम व विणकाम प्रशिक्षण सभागृह, हातमाग प्रशिक्षण सभागृह, रेशीम प्रक्रीया संग्रहालय, रेशीम उत्पादने प्रचार व विक्री केंद्र इत्यादीचा समावेश असेल. या प्रकल्पामुळे रेशीम शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण तसेच प्रात्यक्षिके घेता येणार आहेत. खात्रीशीर रेशीम उत्पादने व वस्त्रे खरेदीदारास उपलब्ध होतील.

कैकाडी राज गणेश मित्र मंडळ रामनगर यांच्या वतीने व संत गजानन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमानाने

# रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर



**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील कैकाडी राज गणेश मित्र मंडळ रामनगर यांच्या वतीने व संत गजानन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमानाने भव्य रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर रामनगर येथे दि.१५/०९/२०२४ रोजी संपन्न झाले. गणेश मंडळातर्फे रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये १५ रक्तदात्यांनी रक्तदान केले व १०० ते १२० जणांनी आरोग्य तपासणी करण्यात आले. यावेळी डॉ.रोहित सुरेश कासट (हृदयरोग, मधुमेह व थॉराईड तज्ञ), डॉ. कुलभुषण आर.मराठे (मधुमेह व हृदयरोग तज्ञ), डॉ.अविनाश सुरूशे (Fellow in Onbo Srugery) यांनी आरोग्य तपासणी केली. सदरील कार्यक्रमाचे आयोजक व मंडळाचे अध्यक्ष रविंद्र बालाजी गायकवाड हे होते. यावेळी सर्व मंडळाचे सभासदांनी परिश्रम घेतले. तसेच ॲड.सविता गायकवाड यांनी आभार मानले.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूल येथे मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील वाटुर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक कुकडे यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व ध्वजारोहण करण्यात आले. मराठवाड्याला निजामाच्या राजवटीतून मुक्त करण्यासाठी अनेक लोकांनी बलिदान दिले होते. यावर शाळेतील काही विद्यार्थ्यांनी भाषणे केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता श्रीमती सय्यद नसरीन. श्रीमती पाटील भाग्यश्री. श्रीमती उबाळे वंदना. श्रीमंती काळे साधना.श्रीमती वायाळ शारदा . शेळके गजानन. यांनी परिश्रम घेतले.



## पान १ वरुन

### आ. संजय गायकवाड...

गणेश ढवळे, लक्ष्मण खोत,शिदू अंभुरे,अंकुश आढे,अनंता भारसाखले,दत्तराव पवार, रफिक कुरेशी,फेरोझ बागवान, दत्ता गाडगे यांच्यासाह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### मुक्तीसंग्रामच्या ...

हुकूमशाही विरोधात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या संपुर्ण आयुष्याची आहुती देवून मराठवाड्याला निजामाच्या गुलामगिरीतून मुक्त केले. मराठी भाषा, मराठी संस्कृती, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक व राजकीय हक्क प्राप्तीसाठी या भागातील जनतेने जो त्याग केला, तो सुवर्ण अक्षरांनी लिहावा असाच आहे. सर्व थोर हुतात्मे आणि स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाची जाणीव सदैव रहावी तसेच आजच्या पिढीला मुक्तीसंग्रामाचा महान इतिहास समजण्यास मदत व्हावी, या उद्देशाने मराठवाड्यात प्रथमच जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नाविण्यपूर्ण संकल्पनेतून तो नूतन जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहाच्या आतील बाजूस हुबेहुब साकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामातील भित्तीचित्राचे प्रत्यक्ष अवलोकनही पालकमंत्री श्री. सावे यांनी यावेळी केले. या नूतन वास्तुचे इंटेरिअर डिझाईन वास्तुविशारद जगदिश नागरे यांनी केले आहे.

### जालना जनसेवा ...

आपले सर्वतोपरी सहकार्य राहील, असे ते म्हणाले. श्री. आंबेकर म्हणाले की, स्टील आणि सीडस सिटी अशी ओळख असलेल्या जालना शहरात दानशूर मोठ्या प्रमाणात आहेत. अनेक स्वयंसेवी आणि सामाजिक संघटनाही आहेत. त्यापैकीच एक जालना जनसेवा ग्रुप म्हणजे आदर्श समाजसेवेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. अक्षय गोरंट्याल म्हणाले की, ज्यांचे जीवनच जनसेवा बनले आहे अशा जालना जनसेवा ग्रुपचा सर्वांनी आदर्श घेतला पाहिजे व आपल्याला जेवढे शक्य आहे तेवढीतरी जनसेवा केली पाहिजे. कारण जनसेवेतच आत्मिक समाधान सामावलेले आहे. सेवा अनेक प्रकारे करता येते. जनसेवा ग्रुप अनेक उपक्रम राबवित आहे. गोसेवासह गरजू विद्यार्थ्यांना स्किल डेव्हलपमेंट प्रशिक्षण देण्याचे कार्य निश्चितच त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविणारा उपक्रम आहे. पुरुषोत्तम मोतीवाला म्हणाले की, गणेशोत्सव म्हणजे प्रत्येक भारतीयांचा जिव्हाळ्याचा उत्सव असतो. बडीसडकवरील गणेशोत्सव हे जालना जिल्ह्याचेच नव्हे तर मराठवाड्याचे विशेष आकर्षण ठरत आहे. या महामार्गावर शेवटचे पाच दिवस मोठ्या प्रमाणात अन्नदान होते. गेला काही वर्षापासून जालना जनसेवा ग्रुपही या ठिकाणी गणेश भक्तांसाठी प्रसाद वाटप करत आहे. दिवसेंदिवस कार्य विस्तारत चालले असून, वाढता प्रतिसाद पाहता, पुढील गणेशोत्सवात शुद्ध तुपातील पाच क्विंटल जिलेबी प्रसाद स्वरूपात वाटप करण्याचा जनसेवा ग्रुपचा त्यांनी व्यक्त केला पन्नालाल बगडीया म्हणाले की, गणेश भक्तांच्या वाढत्या प्रतिसादामुळे जालना जनसेवा ग्रुपचा उत्साह वाढला आहे. शुद्ध तुपातील चार क्विंटल जिलेबी वाटपानंतर दुसऱ्या दिवशी सौ. जमनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे प्रसिद्ध आणि स्वादिष्ट पंधरा हजार शेगाव कचोरीचे वाटप करण्यात आले. प्रसाद स्वरूपातील कचोरीचे गणेश भक्तांना अत्यंत शिस्तबद्धपणे रांगेत वाटप करण्यात आले. दोन्ही दिवशी गणेश भक्तांनी प्रसाद स्वरूपातील जिलेबी आणि कचोरीचा आस्वाद घेतला.

# पितृपक्षास सुरुवात; पूर्वजांना दाखवा नैवेद्य

**भोकरदन । तडेगाव । प्रतिनिधी -** पितृपक्षाला बुधवार (दि १८) रोजीपासून सुरुवात झाली आहे

पूर्वज प्रसन्न असल्यास सुख, समृद्धी आणि संततीसाठी शुभ आशीर्वाद प्राप्त होतात. यावर्षी पितृ पक्ष मंगळवार १७ सप्टेंबर २०२४ रोजी सुरू होत आहे. पितृपक्षात पितरांच्या शांतीसाठी श्राद्ध करण्याची परंपरा आहे. दिनांक अठरा सप्टेंबर पासून पितृपक्ष सुरू झाला आहे २४ सप्टेंबर २०२४, मंगळवार- अष्टमी श्राद्ध

पितृ पक्षात स्नान आणि दान यांचे विशेष महत्त्व आहे. त्यामुळे एखाद्या पवित्र ठिकाणी जाण्याची संधी न मिळाल्यास घरातच गंगाजल पाण्यात मिसळून स्नान करावे. तसपितृ पक्षाच्या काळात गरजूंना अन्न, पैसे किंवा कपडे दान करा. पितृपक्षात पशु-पक्ष्यांची सेवा केल्यानेही विशेष लाभ होतो, त्यामुळे पितृपक्षाच्या काळात कावळे, गाय, कुत्रे इत्यादींना घरगुती अन्नाचा काही भाग जरूर द्यावा. असे केल्याने पितर प्रसन्न होतात असे मानले जाते.



## राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल येथे मराठवाडा मुक्ती दिन उत्साहात



**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** स्थानिक जिजाऊ इंग्लिश स्कूल टेंभुर्णी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल ,स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. तदनंतर सुयश भैय्या संजयजी लहाने यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . कार्यक्रमाचे अध्यक्ष सुयश भैय्या लहाने हे होते तर प्रमुख उपस्थिती

प्राचार्य संजय फलटणकर प्राचार्य पंजाब लहाने प्राचार्य गजानन वायाळ प्राचार्य पठाण सर सर्व शिक्षक शिक्षक वृंद उपस्थित होते. यावेळी शाळेतील शिक्षक विनोद उबरहंडे, अमोल तेलंग्रे, नवाज शेख, दत्तात्रय गाडेकर, विमल एस, भागवत लहाने, विनोद धवलीया, वनिता बोडखे, रोहिणी सोळुंके, वैष्णवी पिंपळे, सविता बकाल, स्नेहल रिंढे, सुनीता मोरे, अश्विनी दुनगहु, विमल मदन, प्रभाकर रोकडे, केशव पंडितकर, बाळू चव्हाण, अंकुश जोशी इत्यादींची उपस्थिती होती.

ईद-ए-मिलाद निमित्ताने युथ मुवमेंट ऑफ महाराष्ट्रच्यावतीने रक्तदान शिबिर

# १०३ दात्यांनी केले रक्तदान; आठ वर्षांपासून जपताहेत परंपरा

**दत्ता देशमुख**

**जाफ्राबाद -** येथे युथ मुवमेंट ऑफ महाराष्ट्र जाफ्राबाद च्या वतिने आज इद ए मिलाद च्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते ज्यामधे १०३ युवकांनी मोठ्या उत्साहात रक्तदान केले

यावर्षीही पोलिस निरिक्षक प्रताप इंगळे यांच्या उपस्थितित शिबिराचे उदघाटन करण्यात आले सविस्तर व्रत्त असे की जाफ्राबाद येथील यूथ मुवमेंट ऑफ जाफ्राबाद तर्फे तब्बल आठ वर्षापासुन इद ए मिलाद च्या दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे व याला तरुनांतर्फे उत्तम असा प्रतिसाद मिळत आहे स्वामी समर्थ ब्लड बँक जालना हे रक्त संकलन करत आहे ज्यामधे प्रकाश भांगे ,डॉ राजेंद्र सुर्यनारायण ,बिपिनकुमार मगरे ,धनराज राठोड ,ओमकार क्षीरसागर ,हरीम क्षीरसागर,पुजा कांबले ,रहिम सय्यद आदी जण उपस्थित होते तसेच युथ मुवमेंट चे सर्व पदाधिकारी उपस्थित होते आतापर्यत आठ वर्षापासुन तब्बल १२०० ते १५०० युवकांनी रक्तदान केले

इद ए मिलाद म्हणजे उर्दु तिथिनुसार रब्बिउल अव्वल ची १२ तारीख ज्यादिवशी इस्लाम चे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्म झाला व याच दिवशी त्यांनी जगाचा निरोप घेतला पवित्र कुरान मधिल एका आयतित सांगितल्याप्रमाने ज्या कोणी व्यक्तिने एका मानसाचा जिव वाचवला त्याने संपुर्ण मानवजातिचा जिव वाचवला पैगंबर आपल्या अनुयायांना नेहमी सांगत जाफ्राबाद येथील युथ मूवमेंट ऑफ जाफराबाद चा वतिने



त्या अनुषंगाने मानुसकी जपण्याकरिता मानसांनी मानसांच्या भल्यासाठी कार्य करित राहावे असे मोहम्मद

विशेष म्हणजे जगभर हा दिवस मुस्लीम बांधव मोठ्या आनंद आणी उत्साहाने साजरा करतात त्याचप्रमाने रक्तदानाचा आदर्श असा उपक्रम राबिवला जात आहे ज्यामधे शेकडो तरुण रक्तदान करत आहे

सतीश घाटगेंकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मनातली घोषणा!

# गाळप झालेल्या ऊसाला यंदाही देणार उच्चांकी भाव

**घनसावंगी । प्रतिनिधी -** ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह समाजातील विविध घटकासाठी अभिनव योजना आणि उपक्रम राबवून मराठवाड्यात ओळख निर्माण केलेल्या घनसावंगी तालुक्यातील समृद्धी साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२३ -२४ च्या अंतिम दराबाबत मोठी घोषणा केली असून समृद्धी साखर कारखाना उच्चांकी दराची परंपरा कायम ठेवणार असून शेतकऱ्यांच्या ऊसाला मराठवाड्यात सर्वाधिक भाव समृद्धी साखर कारखान्याचाच असेल,अशी माहिती कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी दिली आहे. त्यामुळे घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

घनसावंगी तालुक्यातील मूर्ती फाटा ते भादली शेतरस्त्याचे काम सतीश घाटगे यांनी स्वखर्चातून रविवारी सुरु केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले की, गेल्या तीन वर्षापासून समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देत आला आहे. ही परंपरा यंदाही कायम राहणार असून गाळप हंगाम २०२३ -२४ मध्ये गाळप झालेल्या उसाला मराठवाड्यातील इतर कारखान्यापेक्षा सर्वाधिक भाव 'समृद्धी'चा असेल असा विश्वास त्यांनी दिला.

मूर्ती फाटा ते भादली शेतरस्ता दुरुस्त व्हावा, अशी मागणी येथील शेतकऱ्यांची होती. शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी येणारी ही अडचण समृद्धी कारखान्याने

गावकऱ्यांच्या उपस्थितीत या रस्त्याचे काम सुरु केले.या कार्यक्रमास भाजपा युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष शिवाजीराव कंटूले, ओबीसी नेते बाळासाहेब बोरकर यांच्यासह आदी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांच्या जीवनात 'समृद्धी' आणण्याचे स्वप्न**

संघर्षाच्या काळात समृद्धी कारखान्याला शेतकऱ्यांनी साथ दिली. म्हणून त्यांच्या उपकाराची परतफेड म्हणून मागेल



त्या गावातील रस्ते करण्याची मोहीम स्वखर्चातून समृद्धी कारखान्याने सुरु केली आहे. शेतकऱ्यांच्या कष्टावर समृद्धी कारखाना उभा आहे. म्हणून त्यांना मान, सन्मान आणि स्वाभिमान मिळवून देण्यासाठी कारखाना काम करत आहे.प्रत्येक शेत रस्ता दर्जेदार करून शेत -पानंद रस्ते मुक्त घनसावंगीचे स्वप्न माझे असून ते पूर्ण केल्याशिवाय कारखाना थांबणार नाही. असे सतीश घाटगे यांनी सांगितले.

## महात्मा फुले विद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा

**घनसावंगी । प्रतिनिधी -** तालुक्यातील पानेवाडी येथील महात्मा फुले विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्रामदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अमोलभैय्या तिडके यांच्या हस्ते झाले. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव श्री. आत्मारामजी तिडके हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. ए. ए. तिडके, पर्यवेक्षक श्री. एस. एस. गोसावी हे होते. अध्यक्षांनी व प्रमुख पाहुण्यांनी थोर नेत्यांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी विद्यार्थ्यांची भाषणे झाली व विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. अध्यापक श्री. एन. आर. माटे यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. आर. ए. आंधळे यांनी केले. कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार श्री. आर. वाय. चौधरी यांनी मानले.



# पती हयात असतांना दाखवले मयत

## संबंधीत तलाठ्यांवर कारवाई करा; पत्नीचे उपोषण

**जालना । प्रतिनिधी -** पती हयात असताना त्यांना मयत्त दाखवून आम्हाला मिळणारी वयोवृध्दाची पेन्शन न मिळाल्यामुळे माझे पती मयत असल्याची बाब माहीती झाल्यामुळे पती मयत झाले व त्याबाबत शासनाकडे न्याय मागितला असता मला वयोवृध्द मागासवर्गीय विधवा महिलेस न्याय न मिळाल्यामुळे व संबधीत तलाठी



यांनी खोटी माहीती दिल्यामुळे त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही न झाल्यामुळे १६ सप्टेंबर रोजीपासून भोकरदन तालुक्यातील सिरजगाव मंडप येथील सुभद्राबाई रामराव सिरसाट यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपल्या कुटुंबासोबत आमरण उपोषण सुरू केले आहे. आजचा उपोषणाचा तिसरा दिवस असून प्रशासनाचे कोणीही उपोषणस्थळी फिरकले नाही.

सुभद्राबाई रामराव सिरसाट यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भोकरदन तालुक्यातील सिरजगाव मंडप येथील रहिवासी असुन मी व माझे पती आम्ही दोघेही वयोवृध्द झालेला होतो, माझे पती यांना महाराष्ट्र शासनाकडुन श्रावण बाळ योजने अंतर्गत पैसे मिळत होते व त्यावर माझे पती यांचा औषध उपचार खर्च चालत होता. तसेच माझे पती यांची पगार बंद झाल्यामुळे मी त्याबाबत संपुर्ण चौकशी केली असता तलाठी अरुण संपतराव गांवडे यांनी माझे पती हयात असताना मयत असे घोषित करुन मिळणारी पगार बंद केली. या बाबत माझे पती यांना माहीती मिळाली असता त्या धास्तीने ते मयत झाले असल्याचा आरोपही सुभद्राबाई सिरसाट यांनी निवेदनात केला असून मी याबाबत वरिष्ठाकडे तक्रार दिली असतांना सुध्दा माझे वयोवृध्द विधवा महिलेचे काही एक न ऐकुण घेता व मला कुठल्याच प्रकारचा न्याय न देता आजपर्यत माझी एक प्रकारची हेळसांड करण्या आलेली आहे. माझे पती मयत झाल्यामुळे मी आज रोजी विधवा होवुन अन्याय सहन करीत आहे. तसेच एप्रिल २०२३ मध्ये मयत दाखविण्यात आले असता ते त्यावेळी जीवंत होते. मात्र मयत झाल्याचे दाखविल्याने त्याच्या धास्तीने रामराव सिरसाट २५ नोव्हेबर २०२३ रोजी मयत झाले असल्याचे मयताची पत्नी सुभद्राबाई सिरसाट यांनी म्हटले आहे. एकाच गावातील रहिवाशी असलेले रामराव सिरसाट यांना दोन गावात रहिवाशी असून दाखविण्यात आले. तसेच सिरसगाव सजाचे तलाठी राजेंद्र कारभारी औताडे यांनी खोटा रिपोर्ट व पंचाच्या सहया घेवुन तहसिलदार यांना रिपोर्ट दिल्यामुळे व माझा मोठा मुलगा रमेश सिरसाट हा आम्हाला सांभाळ करीत नसुन त्याने तलाठी यांच्याशी हात मिळवणी करुन आमच्या विरोधात खोटा रिपोर्ट केल्यामुळे तलाठी औताडे यांच्यावर सुध्दा कार्यवाही व्हावी. माझे पती हयात असताना मयत दाखविल्यामुळे संबधीत तलाठी यांच्यावर कायदेशिर कार्यवाही या मागणीसाठी १६ सप्टेंबर रोजीपासून सुभद्राबाई रामराव सिरसाट यांच्यासह मुले किशोर रामराव सिरसाट दिपक रामराव सिरसाट यांनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. यावेळी प्रशासनाचे अधिकारी उपोषणस्थळी येऊन संबधिताची चौकशी करू असे लेखी आश्वासन दिले होते, मात्र उपोषणकर्ते यांनी उपोषण सुरू असताना तलाठयाची चौकशी करून कारवाई करावी नंतरचं उपोषण मागे घेऊ असा पवित्रा घेतला. आजचा उपोषणाचा तिसरा दिवस आहे.

मिरजगावमध्ये ब्रिटिशकालीन वास्तूचे विस्तारीकरण, मनीष सिसोदिया यांच्या हस्ते लोकार्पण होणार

# आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून कर्जत-जामखेडमध्ये शैक्षणिक विकासाला चालना

**कर्जत । जामखेड । प्रतिनिधी -** आमदार रोहित पवार यांच्या माध्यमातून कर्जत-जामखेड विधानसभा मतदरसंघातील मिरजगाव येथील ब्रिटिशकालीन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे नूतनीकरण करण्यात आले असून, या शाळेचं तसेच जामखेडमधील जिल्हापरिषद मुलींच्या शाळेच्या १० वर्ग खोल्यांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या दोन्ही वास्तूचं दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे नेते मनीष सिसोदिया यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे. यासोबतच जामखेडमधील जिल्हा परिषद शाळेत नव्याने ५ वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यात येणार असून त्याचे भूमिपूजनही यावेळी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला अहिल्यानगरचे खा.निलेश लंके आणि प्रा.नितेश कराळे मास्तर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

हा कार्यक्रम शुक्रवारी, २० सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता जिल्हापरिषद शाळा, जामखेड तर सकाळी १० वाजता मिरजगाव बाजारतळ याठिकाणी होणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात यासाठी आमदार रोहित पवार सातत्याने प्रयत्नशील आहेत. या शाळांच्या नूतनीकरणामुळे विद्यार्थी उत्तम वातावरणात शिक्षण घेऊ शकतील.



यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

शाळा व शैक्षणिक सोयीसुविधांच्या विकासासाठी राबविल्या जात असलेल्या या उपक्रमामुळे कर्जत-जामखेड परिसरातील शैक्षणिक स्तर उंचावण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाची सध्या जोरदार तयारी सुरू असून या लोकार्पण आणि भूमिपूजन सोहळ्याला कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना केले पारितोषीकांचे वितरण

**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सवानिमित्त संघर्ष गणेश मित्र मंडळाच्या वतीने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या दहा दिवस चाललेल्या शालेय स्पर्धेत अनेक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवुन अनेक स्पर्धेत कौशल्य दाखविले होते. या स्पर्धेचा निकाल दि.१६ सप्टेंबर रोजी जाहिर करण्यात आला. संघर्ष गणेश मित्र मंडळ रानमळा यांच्या वतीने घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे १) अनिकेत अशोक बुधवंत ( प्रथम ) वर्ग ८ वा २) अनिकेत महादेव मुसळे (द्वितीय) वर्ग ८ वा ३) राहुल प्रभाकर गिरी : (तृतीय) वर्ग ७ ४) गोपाल प्रकाश आघाव : (चौथा) वर्ग ८ : ५) ज्ञानदीप आत्माराम टाकरस वर्ग ६ वा ६) ज्ञानराज रमेश पालवे वर्ग ६ वा तिसरी ते पाचवी मध्ये १)वेदांत वामन घुगे वर्ग ५ वा प्रथम २) मोनिका अशोक बुधवंत वर्ग ५ वा द्वितीय ३) पूजा गोविंद मुसळे वर्ग ५ वा तृतीय ४) यशराज गणेश पालवे वर्ग ४ था चौथा ५) आर्यन गजानन शहाणे वर्ग ३ रा चौथा सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संघर्ष गणेश मित्र मंडळाच्या वतीने बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मराठवाडा मुक्ती संग्रामदिनानिमित्त १७ सप्टेंबर २०२४ मंगळवार रोजी श्री संत भगवान बाबा मंदिर रानमळा येथे सकाळी ८:३० वाजता पार पडला आहे जिल्हा परिषद शाळा रानमळा येथील सर्वच शिक्षक वृंद तसेच सर्व गावकरी मंडळी व गणेश मंडळाचे सदस्य उपस्थित उपस्थित होते.



**प्रखर हिंदुत्ववादी विचारांचे पालक, हिंदूधर्मास सर्वोत्परि मानणारे श्री. श्रीकांत पांगारकर मागील सहा वर्षांच्या दिर्घ काळानंतर जालना शहरात परतले. प्रसंगी भाजपाचे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, अशोक पांगारकर, सिद्धिविनायक मुळे, वसंतराव शिंदे, निवृत्ती लंके, गोवर्धन कोल्हे उपस्थित होते.**

पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

# मुक्तीसंग्रामाचा लढा मराठवाड्याच्या स्वातंत्र्य सैनिकांनी शौर्याने लढला - पालकमंत्री सावे

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाड्यातील जनतेला निजामाच्या बंधनातून मुक्त करुन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात संपूर्ण हैदराबाद संस्थानात मोठ्या प्रमाणात सशस्त्र लढा उभारण्यात आला होता. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा लढा मराठवाड्याच्या गावा-गावातून अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी शौर्याने लढला, असे प्रतिपादन राज्याचे गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.



मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापन दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री श्री. सावे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जनतेला उद्देशून शुभेच्छा संदेश देताना ते बोलत होते. यावेळी आमदार राजेश टोपे, माजी मंत्री अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त उपस्थित सर्वांना शुभेच्छा देताना मंत्री श्री. सावे म्हणाले की, देशाला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी देशातील ५६५ संस्थानांपैकी ५६२ संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाली. परंतु हैदराबाद, काश्मिर आणि जुनागढ ही तीन संस्थाने मात्र स्वतंत्र भारतात सामील झाली नव्हती. त्यामुळे मराठवाड्यातील जनता ही निजाम संस्थानाच्या जूलमी राजवटीखालीच होती. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा लढा स्वातंत्र्य सैनिकांनी शौर्याने लढला. हा केवळ संस्थांनाच्या विलिनीकरणाचा लढा नव्हता तर भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा लढा होता. निजाम शरण येत नाही. तसेच रझाकारांचे नागरिकांवर अत्याचार वाढत असल्याचे पाहून, भारत सरकारचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निजामाच्या विरोधात ऑपरेशन पोलो अंतर्गत पोलीस क्शन सुरु केली. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे आंदोलन सतत १३ महिने सुरु होते. या आंदोलनात अनेक महान स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अखेर १७ सप्टेंबर, १९४८ रोजी निजामाच्या जूलमी राजवटीतून मराठवाडा मुक्त होवून भारतीय संघ राज्यात विलीन झाला. आणि या लढ्यामुळेच भारतीय स्वातंत्र्याला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्राप्त झाले. मराठवाडा मुक्तीसंग्रामात जालनाकरांनी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामात ज्या महाराष्ट्र परिषदेचे महत्वाचे योगदान आहे. त्याची सुरुवात जालना जिल्ह्यातील परतूर येथील महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनापासून झाली होती. तसेच मराठवाडा मुक्तीसंग्रामात कोलते पिंपळगावकरांचे मोठे योगदान आहे. असेही त्यांनी सांगितले.

मुक्तीसंग्रामासाठी जालना जिल्ह्यातील जनतेने प्रचंड त्याग व बलिदान देवून हा लढा यशस्वी केला होता. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वात मराठवाड्याची झाशीची राणी दगडाबाई शेळके, जनार्दन मामा अशा अनेक स्वातंत्र्य सैनिकांच्या पुढाकारातून मुक्तीसंग्रामाचा हा सशस्त्र लढा लढला गेला होता. मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात अनेक महिला स्वातंत्र्य सैनिकांनी देखील स्वयंस्फूर्तीने सहभागी होवून मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात आपले महत्वपूर्ण योगदान दिले होते. या सर्व थोर स्वातंत्र्य सैनिकांच्या महान कार्याची आठवण व त्यांना श्रध्दांजली देण्याकरीता येथील नवीन जिल्हा नियोजन समितीच्या इमारतीमधील पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्या कार्यालय परिसरात मुक्तीसंग्रामाचा इतिहास व वारसा सांगणारे भित्तिचित्र तयार करण्यात आले आहे. यामुळे आजच्या पिढीला आपल्या मुक्तीसंग्रामचा महान इतिहास समजण्यास मदत होणार आहे. असेही पालकमंत्री श्री.सावे यांनी सांगितले.

प्रारंभी टाऊन हॉल परिसरातील लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. तसेच पोलिस जवानांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून व पोलिस बँड पथकाने शोकधून वाजवून हुतात्म्यांना मानवंदना दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी मराठवाडा मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक यांच्यासह त्यांच्या वारसांची श्री. सावे यांनी भेट घेत त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली व त्यांचा यथोचित सत्कार केला.

**महसूल विभागाला नवीन तीन वाहनाचे लोकार्पण**

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जिल्हा वार्षिक योजनेखाली महसूल विभाग अधिनस्त क्षेत्रीयस्तरावर गतीमान प्रशासन तथा आपात्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण योजनेतंर्गत जुन्या तीन निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहन देण्यात आली. यामध्ये महिंद्रा बोलेरो निओ वाहन तहसीलदार परतुर व जालना तसेच उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना हस्तांतरित करण्यात आले. या वाहनाचे लोकार्पण पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी मंत्री अर्जून खोतकर, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, यांची प्रमुख उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.